# शेततळे

## (इनलेट आऊटलेटसह शेततळे/ इनलेट आऊटलेट विरहित शेततळे/ शेततळ्यास अस्तरीकरण)

**प्रस्तावना:**

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदलाविषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून भू-गर्भातील पाणीसाठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. तसेच पूर्णा नदीच्या खो-यातील भू-भाग हा निसर्गत:च क्षारपड असल्याने शेतीसाठी सिंचनास मर्यादा येत आहेत. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्पभू-धारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे.

राज्यातील पर्जन्यावर आधारित कोरडवाहू शेतीची पाणलोट व जलसंधारणाच्या माध्यमातून उत्पादकता वाढविण्यासाठी विविध योजनामधून अनुदानावर शेततळे योजना राबविण्यात आलेली आहे व येत आहे. त्यामुळे शेतक-यांचे उत्पादन व उत्पन्नात वाढ होऊन शेतक-यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे. सद्यस्थितीत राज्यातील टंचाईग्रस्त परिस्थिती पाहता व शेतक-यांकडे पिकास संरक्षित सिंचन देणेकरिता व्यवस्था निर्माण करण्यासाठी जागतिक बँक अर्थसहाय्यीत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत जलसंवर्धनासाठी नवीन संरचानांचे बांधकाम या उपघटकांतर्गत वैयक्तिक शेततळे, सामुदायिक शेततळे, शेततळयांची साठवणूक क्षमता वाढविणे इ. सामुदायिक व वैयक्तिक लाभाचे घटक राबविणे प्रस्तावित आहे.

**उद्दिष्टे:**

१. प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गाव समुहामधील अल्प व अत्यल्प भूधारक शेतक-यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम बनविणे.
२. संरक्षित सिंचनाची सुविधा निर्माण करणे.
३. दुबार पिकाखालील क्षेत्र वाढविणे व शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ करणे.

**लाभार्थी निवडीचे निकष :**

१. प्रकल्पांतर्गत निवड केलेल्या गावासाठीच्या ग्राम कृषि संजीवनी समितीने (VCRMC) मान्यता दिलेले अत्यल्प व अल्प भूधारक शेतकऱ्यांना, अनु. जाती/जमाती, महिला, दिव्यांग व इतर शेतकरी या प्राधान्यक्रमाने निवड करून लाभ देण्यात येईल.
२. निवडलेल्या आकारमानाच्या शेततळ्यासाठी तांत्रिक निकषानुसार योग्य जागा उपलब्ध असणे आवश्यक आहे.
३. शेततळ्याचे अस्तरीकरण या घटकासाठी इतर कोणत्याही शासकीय योजनेतून अथवा शेतकऱ्याने विहीत आकारमानानुसार स्वत: इनलेट आउटलेट विरहीत शेततळे केले असल्यास अस्तरीकरण या घटकासाठी शेतकरी पात्र राहील.

**शेततळयांच्या जागा निवडीसाठी तांत्रिक निकष :**

शेततळ्यासाठी जागेच्या निवडीबाबत निकष खालीलप्रमाणे राहतील.

१. शेतक-यांकडे स्वत:च्या नावावर कमीत कमी ०.६० हेक्टर क्षेत्र असावे.
२. ज्या जमिनीतून पाणी पाझरण्याचे प्रमाण कमी आहे अशी जमिन असलेल्या जागेची निवड करावी.
३. काळी जमिन ज्यात चिकण मातीचे प्रमाण जास्त आहे अशा जमिनी शेततळ्यास योग्य असल्याने अशा जमिनीची निवड करण्यात यावी.
४. मुरमाड व वालुकामय सच्छिद्र खडक असलेली जागा शेततळ्याकरिता निवडू नये.
५. क्षेत्र उपचाराची कामे झालेल्या पाणलोट क्षेत्रात शेततळी प्राधान्याने घेण्यात यावीत.

६. शेततळयाच्या क्षमतेनुसार आवश्यक पाणलोट क्षेत्र असल्याची खात्री करावी.
७. नाल्याच्या/ओहोळाच्या प्रवाहात शेततळे घेण्यात येवू नये.
८. इनलेट/आऊटलेट सहित शेततळ्यासाठी पाणलोट क्षेत्रातून येणारे पाणी हे शेततळ्याच्या पाणीसाठा क्षमतेपेक्षा जास्त असणे बंधनकारक राहील.
९. इनलेट/आऊटलेट विरहीत शेततळ्यासाठी पाणी पुनर्भरणासाठी स्त्रोत असल्याची खात्री करण्यात यावी. या बाबी विचारात घेवून शेततळयाचा प्रकार निवड करावा.
१०. लाभार्थी शेतकऱ्याची जमीन इनलेट आउटलेटसह शेततळ्याकरिता तांत्रिक दृष्टया योग्य असणे आवश्यक आहे, जेणेकरून पावसाचे वाहून जाणारे पाणी शेततळ्यामध्ये साठवणे अथवा पुनर्भरण करणे शक्य होईल.
११. इनलेट आऊटलेटसह शेततळे यासाठी लाभार्थी निवडतांना पाणलोट क्षेत्रातून वाहून येणारा अपधाव हा शेततळ्याच्या आकारमानापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे तसेच, पाणलोट क्षेत्रातून वाहून येणारा अपधाव हा नैसर्गिकरित्या शेततळ्यात येणे आवश्यक आहे, याची प्रथम खात्री करावी.

**अर्थसहाय्य:**
या घटकांतर्गत खालील पैकी एका आकारमानाचे शेततळे घेण्यास मुभा राहील. शेततळ्याचे आकारमान हे त्यात होणारा पाणीसाठा व पाणलोट क्षेत्रातुन उपलब्ध होणा-या अपधावेच्या पाणीसाठ्याच्या अनुषंगाने ठेवण्यात यावे. आकारमान निहाय शेततळयाचे पृष्ठभागावरील क्षेत्रफळ (चौ.मी.) आणि अपेक्षित खोदकाम (घ.मी.) खालील प्रमाणे राहील.

**अ. इनलेट आऊटलेटसह शेततळे-**

| अ.क्र. | आकारमान (मीटरमध्ये) | पृष्ठभागावरील क्षेत्रफळ (चौ.मी.) | होणारे खोदकाम (घ.मी.) | अनुज्ञेय अनुदान (रु.) |
|---|---|---|---|---|
| १. | १५ X १५ X ३ | २२५ | ४४१ | २२११० |
| २. | २० X १५ X ३ | ३०० | ६२१ | २९७०६ |
| ३. | २० X २० X ३ | ४०० | ८७६ | ४०४६७ |
| ४. | २५ X २० X ३ | ५०० | ११३१ | ५०००० |
| ५. | २५ X २५ X ३ | ६२५ | १४६१ | ५०००० |
| ६. | ३० X २५ X ३ | ७५० | १७९१ | ५०००० |
| ७. | ३० X ३० X ३ | ९०० | २१९६ | ५०००० |

**ब. इनलेट आऊटलेट विरहित शेततळे-**

| अ.क्र. | आकारमान (मीटरमध्ये) | पृष्ठभागावरील क्षेत्रफळ (चौ.मी.) | होणारे खोदकाम (घ.मी.) | अनुज्ञेय अनुदान (रु.) |
|---|---|---|---|---|
| १. | २० X १५ X ३ | ३०० | ६२१ | २६२०६ |
| २. | २० X २० X ३ | ४०० | ८७६ | ३६९६७ |
| ३. | २५ X २० X ३ | ५०० | ११३१ | ४७७२८ |
| ४. | २५ X २५ X ३ | ६२५ | १४६१ | ५०००० |
| ५. | ३० X २५ X ३ | ७५० | १७९१ | ५०००० |
| ६. | ३० X ३० X ३ | ९०० | २१९६ | ५०००० |

**क. इनलेट आऊटलेट विरहित अस्तरीकरणासह शेततळे-**

| अ. क्र. | आकारमान (मीटरमध्ये) | पृष्ठभागावरील क्षेत्रफळ (चौ.मी.) | होणारे खोदकाम (घ.मी.) | खोदकामासाठी अनुज्ञेय अनुदान (रु.) | अस्तरीकरणासाठी अनुज्ञेय अनुदान (५०% प्रमाणे व जास्तीत जास्त रु. ७५००० चे मर्यादेत) (रु.) | एकूण देय अनुदान (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २० X १५ X ३ | ३०० | ६२१ | २६२०६ | ३१५९८ | ५७८०४ |
| २. | २० X २० X ३ | ४०० | ८७६ | ३६९६७ | ४१२१८ | ७८१८५ |
| ३. | २५ X २० X ३ | ५०० | ११३१ | ४७७२८ | ४९६७१ | ९७३९९ |
| ४. | २५ X २५ X ३ | ६२५ | १४६१ | ५०००० | ५८७०० | १०८७०० |
| ५. | ३० X २५ X ३ | ७५० | १७९१ | ५०००० | ६७७२७ | ११७७२८ |
| ६. | ३० X ३० X ३ | ९०० | २१९६ | ५०००० | ७५००० | १२५००० |

**संदर्भ:** १) जा.क्र. मृदसं शेततळे/मासू/मृद-४/४१७/१६ दि. २२/०२/२०१६: "मागेल त्याला शेततळे" मार्गदर्शक सूचना -२०१६.
२) जाक्र. कृआ-२०१६/विप्र/कोशेअ/मासू १६-१७/प्र.क्र.३४/१६९/२०१६ दि. ०९/०८/२०१६: कोरडवाहू शेती अभियान कार्यक्रम-मार्गदर्शक सूचना-२०१६-१७.

वरीलप्रमाणे विविध आकारमानाच्या शेततळ्यांपैकी कोणत्याही एका आकारमानाच्या शेततळ्याची मागणी करता येईल. यामध्ये जास्तीत जास्त ३० X ३० X ३ मीटर या आकारमानाचे व कमीत कमी इनलेट आऊटलेटसह प्रकारामध्ये किमान १५ X १५ X ३ मीटर या आकारमानाचे व इनलेट आऊटलेट विरहीत प्रकारामध्ये किमान २० X १५ X ३ मीटर या आकारमानाचे शेततळे घेता येईल.

काळ्या मातीमध्ये १:१.५ बाजू उतार ठेऊन विविध आकारमानाचे शेततळी खोदण्यासाठी निश्चित केलेले आर्थिक मापदंड व अनुज्ञेय अनुदानाचा तपशील खालीलप्रमाणे;

| अक्र | आकारमान (मी) | खोदकामाचे प्रमाण (घ.मी.) | शेततळ्यासाठी येणारा खर्च (रु.) | | अनुज्ञेय अनुदान (रु.) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | इनलेट आऊटलेट विरहित शेततळे | इनलेट आऊटलेटसह शेततळे | इनलेट आऊटलेट विरहित शेततळे | इनलेट आऊटलेटसह शेततळे |
| १. | १५ X १५ X ३ | ३५१ | - | १८३१२ | - | १८३१२ |
| २. | २० X १५ X ३ | ५०९ | २१४८० | २४९८० | २१४८० | २४९८० |
| ३. | २० X २० X ३ | ७४१ | ३१२७० | ३४७७० | ३१२७० | ३४७७० |
| ४. | २५ X २० X ३ | ९७४ | ४११०३ | ४४६०३ | ४११०३ | ४४६०३ |
| ५. | २५ X २५ X ३ | १२८१ | ५४०५८ | ५७५५८ | ५०००० | ५०००० |
| ६. | ३० X २५ X ३ | १५८९ | ६७०५६ | ७०५५६ | ५०००० | ५०००० |
| ७. | ३० X ३० X ३ | १९७१ | ८३१७६ | ८६६७६ | ५०००० | ५०००० |

शेततळ्यासाठी वरील आकारमान दर्शविण्यात आले असले तरी शेततळ्याचे आकारमान, पृष्ठभागाचे क्षेत्रफळ व होणारे प्रत्यक्ष खोदकाम यानुसार अनुदान देय राहिल. लाभार्थ्याची मागणी व शेत परिस्थितीनुसार शेततळयाची लांबी, रुंदी कमी जास्त करण्यास मुभा राहिल. उपरोक्त मंजूर आकारमानापेक्षा जास्त आकारमानाचे शेततळे घ्यावयाचे असल्यास मंजूर अनुदानापेक्षा जास्त लागणारा खर्च हा लाभार्थी शेतक-याने स्वत: करावयाचा आहे. तथापि देय अनुदानाची कमाल रक्कम रू.५०,०००/- इतकी राहील. रू.५०,०००/-पेक्षा जास्त खर्च झाल्यास उर्वरित रक्कम संबधित लाभार्थीने स्व: खर्चाने करणे अनिवार्य राहील.

**शेततळयाचे फक्त अस्तरीकरण (इनलेट आऊटलेट विरहित शेततळ्यासाठी अस्तरीकरण)-**

शेततळ्यातील पाणी जमिनीमध्ये मुरते व आवश्यक त्यावेळी संरक्षित सिंचनासाठी पाणी उपलब्ध होत नाही म्हणून निवडलेल्या गावात नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत खोदलेल्या तसेच या पूर्वी इतर योजनेमधून खोदलेल्या इनलेट आउटलेट विरहित शेततळ्यांच्या अस्तरीकरणासाठी अनुदान देय राहील. त्यानुषंगाने शेततळे अस्तरीकरणासाठी मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

१. महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांचे पत्र क्र. मराफऔवम/स. शेत/MNREGS अस्तरीकरण मा.सु./४३६०/११ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार MNREGS व RKVY तसेच इतर योजनेंतर्गत खोदकाम करण्यात आलेल्या इनलेट आउटलेट विरहित शेततळ्यांच्या प्लास्टिक फिल्म अस्तरीकरणासाठीच्या एकूण अनुज्ञेय खर्चाच्या ५०% प्रमाणे अनुदान अनुज्ञेय करण्यात आले आहे.
२. सन २०१४-१५ साठी सामुहिक शेततळे या घटकाबाबतच्या निर्गमित केलेल्या सुधारित मार्गदर्शक सुचनानुसार (दि. १६/१०/२०१४ पासून कार्यान्वित) शेततळे अस्तरीकरणासाठी प्लास्टिक शीट ५०० मायक्रॉन रु. ७७ प्रती चौरस मिटर व शीट बसविण्यासाठी रु. १८ प्रती चौरस मीटर यात्रमाणे निश्चित करण्यात आलेले दर या योजनेसाठी अनुज्ञेय राहतील.
३. शेततळे अस्तरीकरण घटकाखाली प्लास्टिक फिल्म अस्तरीकरणासाठी ५०% अर्थ सहाय्याकरिता विविध आकारमानानुसार अनुज्ञेय तपशिलाप्रमाणे शेततळे अस्तरीकरण या घटकासाठी शेततळ्याच्या प्रत्यक्ष (Actual) मोजमापानुसार लागणाऱ्या खर्चाच्या ५०% किंवा खालील प्रमाणे विविध आकारमानाच्या शेततळ्याच्या अस्तरीकरणासाठी जास्तीत जास्त रु. ७५००० चे मर्यादेत (या पैकी जी रक्कम कमी असेल ती) अर्थसहाय्य देय राहील.

| शेततळ्याचे आकारमान | एकूण क्षेत्रफळ (घ.मी.) | अस्तरीकरणा साठी लागणारी फिल्म (चौ.मी.) | अस्तरीकरणासाठी येणारा खर्च | | | ५०% प्रमाणे जास्तीत जास्त देय अनुदान रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | फिल्मची किंमत (रु. ७७/- प्रती चौ. मी.) | अस्तरीकरणा-साठी खर्च (रु.१८/- प्रती चौ.मी.) | एकूण रक्कम (रु. ९५/-प्रती चौ.मी.) | |
| १५X१५X३ मी. | ४४१ | ५९५.२७ | ४५८३५.७९ | १०७१४.८६ | ५६५५०.६५ | २८२७५.३२ |
| २०X१५X३ मी. | ६२१ | ६६५.२२ | ५१२२१.९४ | ११९७३.९६ | ६३१९५.९० | ३१५९७.९५ |
| २०X२०X३ मी. | ८७६ | ८६७.७५ | ६६८१६.७५ | १५६१९.५० | ८२४३६.२५ | ४१२१८.१३ |
| २५X२०X३ मी. | ११३१ | १०४५.७ | ८०५१८.९० | १८८२२.६० | ९९३४१.५० | ४९६७०.७५ |
| २५X२५X३ मी. | १४६१ | १२३५.७८ | ९५१५५.०६ | २२२४४.०४ | ११७३९९.१० | ५८६९९.५५ |
| ३०X२५X३ मी. | १७९१ | १४२५.८६ | १०९७९१.२२ | २५६६५.४८ | १३५४५६.७० | ६७७२८.३५ |
| ३०X३०X३ मी. | २१९६ | १६४३.४४ | १२६५४४.८८ | २९५८१.९२ | १५६१२६.८० | ७८०६३.४० |

४. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत शेततळे अस्तरीकरणासाठी प्लास्टिक शीट ५०० मायक्रॉन व शीट बसविण्यासाठी वेळोवेळी सुधारित होणारे दर प्रस्तुत बाबीसाठी लागू राहतील.
५. शेततळ्यामध्ये जंगली/मोकाट जनावरे जाऊन शेततळ्याचे व प्लास्टिकचे नुकसान होऊ नये यासाठी शेततळ्याभोवती शेतकऱ्याने स्वखर्चाने कुंपण करावे.
६. यापूर्वी इतर कोणत्याही योजनेतून याच शेततळ्यासाठी अस्तरीकरण या घटकाचा लाभ घेतलेला नसावा. अस्तरीकरणासाठी वापरावयाच्या प्लास्टिक फिल्मचे तांत्रिक निकष परिशिष्ट-१ मध्ये दिले आहेत.

**अंमलबजावणीची कार्यपद्धती : अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या**

**लाभार्थी**

१. इच्छुक शेतकऱ्यांनी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करून अर्ज सादर करावा. तसेच आवश्यक कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावीत.

२. पूर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर मार्गदर्शक सुचानामधील आराखडयाप्रमाणे (Design) व तांत्रिक निकषाप्रमाणे साहित्य वापरुन प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील.
३. लाभार्थ्याने स्वत:/ मजुराद्वारे/ अन्य पर्यायी साधनांच्या (जेसीबी, पोकलेन सारखे मशिन्स) सहाय्याने शेततळे पूर्ण करावयाचे आहे. याकरीता आवश्यक यंत्रसामुग्री उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लाभार्थ्याची राहील. तसेच कामासाठी कोणतीही आगाऊ रक्कम (अग्रीम ) मिळणार नाही.
४. शेततळ्याच्या बांधावर व पाण्याच्या प्रवाहाच्या भागामध्ये स्थानिक प्रजातीच्या वनस्पतीची लागवड करावी आणि शेततळ्याची निगा, दुरूस्ती व गाळ काढणे इ. ची जबाबदारी संबंधीत लाभार्थीची राहील.
५. निवडलेल्या लाभार्थींनी त्यांच्या पसंतीनुसार सेवा पुरवठादार निवडून शेततळ्याचे काम स्वत: करुन घेण्याची मुभा राहणार आहे. परंतू याबाबींची उभारणी मार्गदर्शक सूचनेतील तांत्रिक निकष, आराखडे व दर्जाप्रमाणे करणे बंधनकारक असणार आहे.
६. पावसाळ्यामध्ये शेततळ्यात गाळ वाहून येणार नाही अथवा साचणार नाही यासाठी व्यवस्था लाभार्थ्याने स्वत: करावी. उदा. प्रवाहाच्या दोन्ही बाजूने तुराटया/पराटयाचे आवरण करुन संरक्षण देणे, इनलेट आऊटलेट जवळ ३ ते ४ फांदेरी बांध घालणे.
७. सर्व लाभार्थींनी शेततळे उभारणीच्या निकषाबाबत कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक यांचेकडून मार्गदर्शन/ सूचना घेऊन सदर काम करावयाचे आहे.
८. खोदकाम करतांना दिलेल्या सूचनेप्रमाणे खोदकाम करणे, खोदकाम करताना योग्य तो बाजू उतार राखणे, खोदकामातून निघालेल्या मातीचा आखून दिलेल्या ठिकाणी आवश्यकतेनुसार बर्म सोडून अथवा बर्म न सोडता भराव करणे, भरावाला योग्य तो बाजू उतार, पाया रुंदी, माथा रुंदी ठेवण्यात यावी.
९. शेततळ्याचे खोदकाम पूर्ण झालेनंतर व अस्तरीकरणासह असल्यास अस्तरीकरण पूर्ण झालेनंतर शेतकऱ्याने अनुदान मागणी देयके व आवश्यक कागदपत्रे स्वसाक्षांकित करून अपलोड करावीत.

**ग्राम कृषि संजीवनी समिती (VCRMC)**

१. गाव समूहातील इच्छुक शेतकऱ्यांचे घटकांतर्गत बाबीचा लाभ घेण्यासाठीचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर सर्व अर्ज व अपलोड केलेली कागदपत्रे समूह सहाय्यक यांचे मदतीने छाननी करून अर्जाची अत्यल्प व अल्प भूधारक शेतकऱ्यांना, अनु. जाती/ जमाती, महिला शेतकरी, दिव्यांग व इतर शेतकरी या प्राधान्यक्रमाने निवड करावी.
२. इच्छुक लाभार्थ्याचे ऑनलाईन प्राप्त अर्जाच्या पात्र/अपात्र ते बाबत निर्णय घेऊन अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणासह अवगत करावे.
३. अंमलबजावणी करण्यात आलेल्या घटकांतर्गत बाबींचे सामाजिक लेखापरीक्षण करावे.

**समूह सहाय्यक**

१. इच्छुक लाभार्थी शेतक-यांना नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी व अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करावी.
२. शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी व शेतकऱ्यांने अपलोड केलेली कागदपत्रांची छानणी करुन अर्जांची अत्यल्प व अल्प भूधारक अशी प्रवर्गनिहाय अनु.जाती/अनु.जमाती, दिव्यांग, महिला शेतकरी व इतर सर्वसाधारण शेतकरी या प्राधान्यक्रमाने वर्गवारी करावी.
३. सर्व ऑनलाईन प्राप्त अर्ज ग्राम कृषि संजीवनी समितीसमोर मान्यतेसाठी सादर करणे व मंजूरी प्राप्त झाल्यानंतर तसा ठराव संकेतस्थळावर अपलोड करणे.
४. शेतकऱ्यांस योजनेच्या अटी व शर्ती तसेच शेततळ्याबाबतचे आराखडे व तांत्रिक निकष समजावून सांगावे.
५. खोदकामासाठी आगाऊ रक्कम मिळणार नाही याची जाणीव लाभार्थीस करुन देणेत यावी.
६. पात्र लाभार्थ्यांना पूर्वसंमती बाबत अवगत करणे.

**कृषि सहाय्यक**

१. अपलोड केलेल्या कागदपत्रांची छानणी करताना शेतकऱ्यांचे ऑनलाईन अर्ज, ज्या ठिकाणी घटकाची अंमलबजावणी करावयाची आहे तो शेतकऱ्यांच्या मालकी हक्काचा ७/१२ उतारा, ८-अ यापूर्वी इतर योजनेतून लाभ घेतलेला आहे काय?, प्राधिकृत अधिकाऱ्याचे संवर्ग प्रमाणपत्र (अ. जाती व अ. जमाती शेतकऱ्यांसाठी) आहे काय?, इत्यादी व इतर सर्व अनुषंगीक बाबींची पडताळणी करावी.

२. पात्र अर्जांच्या नियोजित प्रकल्प स्थळाची तसेच ८-अ मध्ये नमूद सर्व गट/सर्वे नं. मध्ये पाहणी तपासणी सूचीनुसार करुन शेततळे आहे/नाही याबाबत तपासणी करावी असल्यास त्याचे आकारमान व शासकीय योजनेतून लाभ घेतला आहे काय याबाबतचा तपशील स्थळ पाहणी अहवालामध्ये ऑनलाईन नमूद करावा. प्रकल्पाच्या DBT app द्वारे भौगोलिक स्थानांकन (Geo-Tagging) करून प्रस्तावित प्रकल्प स्थळ शेततळे उभारणीसाठी योग्य आहे किंवा नाही याबाबतचा अहवाल कृषि पर्यवेक्षक यांना ऑनलाईन अवगत करणे.

३. पाणलोट क्षेत्र, पर्जन्यमान उपलब्ध अपधाव, जमिनीचा प्रकार इ. बाबी आणि संचालक, मृ.सं.व पा.क्षे.व्य. यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व प्रचलित मापदंड विचारात घेऊन अंदाजपत्रक तयार करणे.

४. लाभार्थी शेतकऱ्यांने शेततळ्याचे खोदकाम व अस्तरीकरणासह असल्यास अस्तरीकरण झाल्याचे ऑनलाईन कळविल्यानंतर शेततळ्याचे खोदकाम योग्य असल्याबाबत व उभारणी साहित्य मार्गदर्शक सूचनेत दिल्याप्रमाणे तांत्रिक दर्जाचे असल्याबाबत मोका तपासणी करावी व सर्व बाबींची मापनपुस्तिकेत नोंद घ्यावी. सदर मोका तपासणी अहवाल व प्रकल्पाच्या DBT app द्वारे शेततळ्याचे नैऋत्य कोपरा स्थळाचे अक्षांश/रेखांशासह भौगोलिक स्थानांकन करून कृषि पर्यवेक्षकामार्फत उपविभागीय कृषि अधिकारी यांना ऑनलाईन सादर करावा.

५. अनुदान मागणीसाठी देयके व आवश्यक कागदपत्रे प्रमाणित करून संकेतस्थळावर अपलोड करणे.

६. अंमलबजावणी करण्यात आलेल्या घटकांतर्गत बाबींचे सामाजिक लेखापरीक्षण समूह सहाय्यक समवेत करावे.

**कृषि पर्यवेक्षक**

१. शेतकऱ्याची प्रस्तावित जागा निकषानुसार व तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याची खात्री करावी.

२. शेततळ्याच्या मंजूर आकारमानानुसार खोदकामासाठी प्रत्यक्ष स्थळावर आखणी करून देणे व मार्गदर्शन करणे.

३. शेततळे खोदाईनंतर निघणाऱ्या मातीपासून शेततळ्याच्या भोवती भराव तयार करण्यासाठी साधारणत: तेवढ्याच आकाराची जागा व्यापली जाते, यासाठी स्वत:च्या मालकीचे क्षेत्र विचारात घेवून शेततळयाचे आकारमान निश्चित करण्यात यावे.

४. एकूण लाभार्थ्यांपैकी २५ टक्के लाभार्थ्यांची अनुदान अदायगी पूर्वी तपासणी करून मापनपुस्तिकेत नोंदविलेली परिमाणे योग्य असलेबाबत प्रत्यक्षपणे खात्री करून प्रमाणित कराव्यात व सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात पर्यवेक्षकीय तपासणी अहवाल तयार करावा. अहवालामध्ये देय अनुदान रकमेबाबतची खात्री करावी.

**उपविभाग स्तर (लेखाधिकारी)**

अनुदान प्रस्ताव व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर लेखाधिकारी उपविभाग स्तर यांनी अनुदान प्रस्ताव तपासून पडताळणी करून पात्र प्रस्तावांना उप विभागीय कृषि अधिकारी यांचेकडे अनुदान अदायगीसाठी शिफारस करावी.

**उपविभागीय कृषि अधिकारी**

१. सर्व शेतकऱ्यांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांची छानणी व स्थळ तपासणी अहवाल विचारात घेवून अर्जाच्या पात्र/अपात्रतेबाबत निर्णय घ्यावा व अपात्र असल्यास शेतकऱ्यास कारणासहित अवगत करावे.

२. अर्ज सादर केलेल्या पात्र शेतकऱ्यांस ऑनलाईन पूर्वसंमती द्यावी.

३. अंतिम केलेल्या स्थळनिश्चिती व त्यासाठी कृषि सहाय्यक यांनी तयार केलेले आराखडे/ अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता देणे.

४. शेतकऱ्यास ऑनलाईन पूर्वसंमती देतांना पूर्वसंमती पत्रासोबत शेततळ्याचा आराखडा (Design), त्यासाठीच्या अनिवार्य साहित्याची यादी व साहित्याचे तांत्रिक निकष इत्यादी उपलब्ध करून दयावेत.
५. कृषि सहाय्यक यांनी ऑनलाईन अवगत केल्यानंतर कृषि सहाय्यक यांनी मापनपुस्तिकेत केलेल्या नोंदी व कृषि पर्यवेक्षक यांनी मापनपुस्तिकेतील प्रमाणित केलेल्या नोंदी यांचे आधारे अनुदान प्रस्तावास अदायगी करण्यास मंजुरी द्यावी.
६. अनुदान प्रस्ताव, प्रथम (मोका) व अंतिम तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पासाठीचे (कृषि पर्यवेक्षक) यांनी अनुदान प्रस्ताव तपासून सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात पर्यवेक्षकीय अहवाल तयार करावा.
७. मंजूर आकारमानापेक्षा शेतपरिस्थिती व भूस्तरानुसार खोदकामास मर्यादा आल्यास अशा प्रकरणी उपविभागीय कृषि अधिकारी यांनी स्वत: तपासणी करुन कमी आकारमानाचे काम अंतिम करता येईल. तथापि झालेले काम हे इनलेट आऊटलेट सह शेततळ्यामध्ये किमान शेवटच्या आकारमानाच्या म्हणजे ४४१ घ.मी. इतक्या आकारमानाचे व इनलेट आऊटलेट विरहीत शेततळ्या मध्ये किमान ६२१ घ.मी. इतक्या आकारमानाचे खोदकाम असणे आवश्यक आहे व अशा प्रकारे झालेल्या खोदकामाच्या घनमीटरच्या प्रमाणात प्रोरेटा तत्वावर अनुदान देय राहील.
८. शेततळे घटक अंमलबजावणीसाठी निवड झालेल्या सर्व लाभार्थ्यांसाठी प्रशिक्षण आयोजित करून तांत्रिक निकष, काम पूर्ण करणे संबधी आवश्यक माहिती व देय अनुदान याबाबत संपूर्ण माहिती द्यावी.
९. उपविभाग स्तरावर काम झालेल्या लाभार्थ्यांपैकी अनुदान अदायगी पूर्वी किमान १०% तपासणी करावी व मापनपुस्तिकेतील नोंदी प्रमाणित करून विहित नमुन्यात पर्यवेक्षकीय तपासणी अहवाल अपलोड करावा.

**जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी:-**

१. जिल्ह्यामध्ये उपविभाग स्तरावर लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.
२. उपविभाग स्तरावर काम झालेल्या लाभार्थ्यांपैकी किमान २% तपासणी करावी.

## सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना

१. मार्गदर्शक सुचनांमध्ये नमूद केल्यानूसार शेततळ्याचा प्रकार, आकारमानानूसार व निश्चित केलेल्या तांत्रिक निकषांनुसार उभारणीचा खर्च अनुदानासाठी ग्राहय धरण्यात येईल.
२. प्रकल्प स्थळी कायम स्वरुपी लोखंडी फलक लावून त्यावर "नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या अर्थसहाय्याने" असे नमूद करुन शेतकऱ्याचे नाव, गाव, सर्वे नं., शेततळ्याचे आकारमान, योजना, वर्ष, एकुण खर्च रक्कम, अर्थसहाय्याची रक्कम इत्यादी तपशील नमूद करावा.
३. नैसर्गिक आपत्तीमुळे शेततळयास कोणत्याही प्रकारची हानी पोहोचल्यास नुकसान भरपाई अनुज्ञेय राहणार नाही.

## पर्यवेक्षीय तपासणी अहवाल-शेततळे

| | | |
|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री/श्रीमती |
| ३. | पदनाम | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी/ कर्मचारी | १. श्री/श्रीमती<br>पदनाम<br>२. श्री/श्रीमती<br>पदनाम |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | सर्वे नं./गट न. _________<br>वर्गवारी: ____________<br>(अ.जा./अ.ज./सर्वसाधारण/इतर) ___________<br>मु.पो. ____________________<br>ता. __________ उपविभाग ___________<br>जि. ________ |
| ६. | बाब | शेततळे (इनलेट आऊटलेट सह) |
| ७. | प्रकल्पाचे ठिकाण | |
| ८. | कामाचा कालावधी | |
| ९. | शेततळ्याचे क्षेत्र (हे. आर.) | |
| १०. | प्रकल्पाचा मोका तपासणी तपशील | १. शेततळे क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट क्र. ________<br>२. शेततळयाचे आकारमान -<br>लांबी.........Xरूंदी.........Xखोली........... (मी.)<br>घनफळ (घ.मी.)- |
| ११. | लाभार्थ्यास शिफारस करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम रु. | |
| १२. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | होय/नाही |
| १३. | नसल्यास तफावत रक्कम रु. | |
| १४. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | होय/नाही |
| १५. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय | |
| | | |
| १६. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय | |
| | | |

कृषि सहाय्यक यांचे मोका तपासणी, मंजूर आराखडा व मार्गदर्शक सूचनेनुसार काम पूर्ण झाले असून त्याबाबत मी स्वत: खात्री केली आहे. मापनपुस्तिकेतील नोंदी योग्य असून त्या प्रत्यक्ष स्थळावर जाऊन प्रमाणित केलेल्या आहेत. सदर कामाचा दर्जा योग्य आहे.

**तपासणी अधिकारी, श्री.**
**पदनाम.**
**(स्वाक्षरी)**

**इतर अधिकारी श्री.**
**पदनाम.**
**(स्वाक्षरी)**

**लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी**
**(नाव..................)**

## पर्यवेक्षीय तपासणी अहवाल-अस्तरीकरण

| | | |
|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री/श्रीमती |
| ३. | पदनाम | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी/ कर्मचारी | १. श्री/श्रीमती<br>पदनाम<br>२. श्री/श्रीमती<br>पदनाम |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | सर्वे नं./गट न. _________<br>वर्गवारी: ____________<br>(अ.जा./अ.ज./सर्वसाधारण/इतर) __________<br>मु.पो. ____________________<br>ता. _________ उपविभाग __________<br>जि. ________ |
| ६. | बाब | शेततळे अस्तरीकरण |
| ७. | प्रकल्पाचे ठिकाण | |
| ८. | कामाचा कालावधी | |
| ९. | शेततळ्याचे क्षेत्र (हे. आर.) | |

| | | |
|---|---|---|
| १०. | प्रकल्पाचा मोका तपासणी तपशील | १. शेततळे क्षेत्राचा सर्व्हे नंबर/गट क्र. _______<br>२. शेततळयाचे आकारमान -<br>लांबी.........Xरूंदी.........Xखोली........... (मी.)<br>३.घनफळ (घ.मी.)-<br>४. प्लास्टिक अस्तरीकरण एकूण क्षेत्रफळ -.............चौ.मी.<br>४.रिइनफोर्स्ड एचडीपीई जिओमेंबरेन ५०० मायक्रॉन फिल्म |
| ११. | लाभार्थ्यास देण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम रु. | |
| १२. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | होय/नाही |
| १३. | नसल्यास तफावत रक्कम रु. | |
| १४. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | होय/नाही |
| १५. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय | |
| | | |
| १६. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय | |
| | | |

**तपासणी अधिकारी, श्री.**
**पदनाम.**
**(स्वाक्षरी)**

**इतर अधिकारी श्री.**
**पदनाम.**
**(स्वाक्षरी)**

**लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी**
**(नाव...................)**

## रिइनफोर्स्ड एचडीपीई जिओमेंबरेन ५०० मायक्रॉन फिल्मसाठी आवश्यक गुणधर्म

**(IS: 15351:2015 TYPE II)**

| Sr. No. | Property | Requirement | |
|---|---|---|---|
| | | TYPE II | Method of Test |
| 1 | Thickness (mm), Min. | 0.50 mm | IS:7016 PART 1 |
| 2 | Mass (g/$m^2$), Min. | 420 g/$m^2$ | IS:7016 PART 1 |
| 3 | Dimensions (Length & Width) | As declared + 1 percent with no Negative Tolerance | ANNEX A OF IS 11652 |
| 4 | Carbon black content, Percent, Min. | 2.5 ±0.5 | ANNEX A OF IS 11652 |
| 5 | Breaking load on 20 cm x 10 cm strip, N, Min before U.V. exposure | (D1) 6600N | IS 13162 (PART 5) |
| | | (D1) 6600N | |
| 6 | Strain At Maximum Load, Percent | 20 ± 5% | IS 13162 (PART 5) |
| 7 | Breaking load on 20 cm x 10 cm strip, N, Min after U.V. exposure of 1000H | 80% of actual original value | IS 13162 (PART 2 & 5) |
| 8 | Impact failure load, at 1520mm drop, Min gram force at 50 percent failure | 1840GF | ANNEX B |
| 9 | Tear resistance, N, Min. | 250N | IS 7016 (PART 3) |
| 10 | Puncture resistance, N, Min | 500N | ANNEX D |
| 11 | Bursting strength (Ball burst), (N/$cm^2$), Min | 110 (N/$cm^2$) | IS 7016 (PART 6) |
| 12 | Seam strength before UV exposure (N/mm), Min | 30 (N/mm) | IS 15060 |
| 13 | Seam strength after Uv exposure (N/mm), min | 80% of actual original value | ANNEX B & IS:15060 |
| 14 | Hydrostatic resistance before UV exposure | No leakage at 15kg/$cm^2$ | ANNEX E |
| 15 | Hydrostatic resistance after UV exposure of 1000 hours | 80% of actual original value | ANNEX E |
| 16 | Ash content % Max | 1% | ANNEX F |
| **NOTE:** For hydrostatic resistance test, the test specimen shall be selected such that at least one joint covered, if provided. | | | |